स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

प्रो. (डॉ.) सदानंद भोसले
एम्.ए., पीएच् डी.
**संचालक** (अतिरिक्त कार्यभार)

## राष्ट्रीय सेवा योजना

गणेशखिंड, पुणे – ४११ ००७

कार्यालय क्र. : ०२०–२५६२२६८८/८९
: ०२०–२५६२२६९०/९१
: ०२०–२५६२२६९२
: ०२०–२५६९७३४१

संदर्भ : रासेयो/२०२३–२४/२३२ दि. २४/०७/२०२३

प्रति,
मा.प्राचार्य/संचालक,
रासेयो संलग्नित सर्व महाविद्यालये परिसंस्था,
पुणे, अहमदनगर व नाशिक जिल्हा,
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ.

**विषय : राष्ट्रीय सेवा योजना विभागांतर्गत जिल्हा व विभाग समन्वयक पदाकरिता इच्छुकांची माहिती पाठवण्याबाबत**

महोदय,

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचा राष्ट्रीय सेवा योजना विभाग हा महाराष्ट्रातील सर्वात मोठा विभाग आहे. सुमारे ७०,००० हुन अधिक रासेयो स्वंयसेवक आणि ७०० हून अधिक रासेयो कार्यक्रम अधिकारी या विभागाच्या माध्यमातून आपापल्या महाविद्यालय/परिसंस्थापातळीवर सामाजिक अभियांत्रिकीच्या बाबतीत कार्यात्मक योगदान देत आहेत. रासेयो विभाग हा सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या वाटचालीत व प्रभावशाली मानांकनात महत्त्वाची भर घालत आहे. ही वाटचाल व सक्षमीकरणाची प्रक्रिया अधिक गतिमान करणे ही रासेयो विभागाची व आपल्या सर्वांची जबाबदारी आहे.

रासेयो विभागासाठी जिल्हा समन्वयक व विभाग समन्वयक हे पाठीचा कणा असल्यासारखे आणि अतिशय महत्त्वाचे असे संरचनात्मक मनुष्यबळ संसाधन आहे. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचा रासेयो विभाग हा राष्ट्रीय पातळीवरचा महत्त्वपूर्ण विभाग बनला पाहिजे आणि त्यासाठी हया अशा संरचनात्मक मनुष्यबळाची केवळ उपस्थिती असून उपयोगाचे नाही तर त्यांनी स्वत:च्या ज्ञानाचा, व्यक्तित्त्वाचा, उपस्थितीचा व उर्जादायी सहभागाचा वस्तुपाठ घालून दिला पाहिजे.

महाविद्यालयीन पातळीवरील नियमित कार्यक्रम, विशेष श्रमसंस्कार शिबिर आणि विविध परिपत्रके शिवाय राज्य व राष्ट्रीय पातळीवरील ध्येयधोरणांना अनुसरून जे कार्यरत आपल्याकडे सुपूर्द केले जातील त्याची काटेकोर अमलबजावणी, त्यांचे नियोजन व अवेक्षण अतिशय महत्त्वाचे आहे. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, राष्ट्रीय सेवा योजना विभागामार्फत रासेयो संलग्नीत महाविद्यालयांमध्ये रासेयो विद्यार्थांसाठी विविध सांस्कृतिक व सामाजिक उपक्रम महाविद्यालयस्तर, विभागस्तर, जिल्हास्तर, विद्यापीठस्तर, राज्यस्तर, राष्ट्रीयस्तरावर राबविले जातात. तसेच आव्हान, उत्कर्ष, हिवाळी शिबिर, प्रेरणा शिबिर, राष्ट्रीय एकता शिबिर, युवक आदान–प्रदान, राष्ट्रीय व राज्य साहसी शिबिर, दिंडी यासारखी शिबिरे आयोजित केली जातात. सर्व उपक्रम किंवा वेगवेगळी शिबिरे यांचे नियोजन तसेच या उपक्रमांसाठी विद्यार्थांचा सराव करून घेणे आणि वेळोवेळी शिबिरांबरोबर संघनायक म्हणून जाणे अशी जबाबदारी सर्व जिल्हा समन्वयक व विभाग समन्वयक पार पाडत असतात. तसेच विद्यार्थी आणि विद्यापीठ यांच्यातील दुवा म्हणून हे काम करत असतात.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या अंतर्गत पुणे, नाशिक व अहमदनगर या तिन्ही जिल्हयांमध्ये रासेयोचे अधिक मजबूत संरचन करण्यासाठी रासेयो विभागाकडून पुणे शहर, पुणे ग्रामीण, अहमदनगर व नाशिक अशा चार विभागात १६ जिल्हा समन्वयक व ७० विभाग समन्वयक यांचे मा. कुलगुरू यांच्याकडून नामनिर्देशन करण्यात येणार आहे. आपल्या महाविद्यालयातील जिल्हा समन्वयक व विभाग समन्वयक पदाकरिता इच्छुक राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या योजना व उपक्रमांची माहिती असणारे आणि राष्ट्रीय सेवा योजना विभागाचा कार्यक्रम अधिकारी म्हणून किमान ३ वर्षांचा अनुभव असणाऱ्या शिक्षकांची विस्तृत माहिती कार्यात्मक सारांशासह आपल्यामार्फत nss@unipune.ac.in या मेलवर Distric/Area Coordintor Aplication 2023-24 या विषयासह किंवा स्वहस्ते राष्ट्रीय सेवा योजना कार्यालयाकडे दि. १५ ऑगस्ट २०२३ पर्यंत पाठविण्यात यावी. कळावे, ही विनंती.

संचालक
राष्ट्रीय सेवा योजना